# जिल्हा परिषद नाशिक

## जाहिर ई-निविदा सन 2023-24 (Quality Cost-Based Selection)

शिक्षण विभांग (माध्यमिक), जिल्हा परिषद नाशिक मार्फत खालील तपशिलात नमूद केल्याप्रमाणे Schedule Cast Plan (SCP), आदिवासी उपयोजना (TSP) व सर्वसाधारण उपयोजने अंतर्गत नाशिक जिल्हयातील ग्रामीण भागातील 1 लक्ष उत्पन्नाच्या मर्यादेतील गुणवत्ताधारक निवडक 110 विद्यार्थ्यांना सन 2023-24 व 2024-25 या दोन वर्षासाठी JEE+NEET या व्यावसायिक पात्रता प्रवेश परीक्षेचे नियमित इयत्ता 11 वी व 12 वी विज्ञान शाखेच्या नियमित अभ्यासक्रमाबरोबर निवासी निशुल्क प्रशिक्षण देणेसाठीच्या सुपर-50 या नाविण्यपूर्ण उपक्रमाबाबत शासन मान्यता असलेले अधिकृत शाळांकडून/संस्थाकडून ई-निविदेव्दारे निविदा मागविण्यांत येत आहे. सदरच्या निविदा हया **(Quality Cost-Based Selection)** या मूल्यांकन पध्दतीने इच्छुक असलेल्या संस्थांचे मूल्यांकन करण्यासाठी ई-निविदेव्दारे निविदा मागविण्यात येत आहे. यासाठी मूल्यांकनाचा तपशिल www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

| अ. क्र. | तपशिल | निविदा रक्कम | कोऱ्या निविदा अर्जाची किंमत | बयाना रक्कम किमंत |
|---|---|---|---|---|
| 01 | सुपर-50 नाविन्यपूर्ण उपक्रमातंर्गत नाशिक जिल्हयातील ग्रामिण भागातील 1 लक्ष उत्पन्न मर्यादेतील अनुसूचित जाती उपयोजना (SCP) अंतर्गत अनुसूचित जातीचे-15 विद्यार्थी (JEE+NEET ) साठी, आदिवासी उपयोजना (TSP) अनु.जमातीचे 40 विद्यार्थी (JEE+ NEET) साठी व इतर सामाजिक प्रवर्गातील 55 विद्यार्थी असे एकुण 110 मुले-मुलीकरिता JEE+NEET या व्यावसायिक प्रवेश परिक्षांकरिता Super-50 या नाविन्यपूर्ण उपक्रमासाठी सन 2023-24 व 2024-2025 या दोन वर्षासाठी 110 विद्यार्थ्यांना निवास, भोजन व्यवस्थेसह प्रशिक्षण देणे बाबत.<br>(सन 2023-24 साठी प्रती विद्यार्थी कोचिंग, प्रती विद्यार्थी पुस्तके व स्टडी मटेरियल, शैक्षणिक सरावासाठी टॅब सुविधा, निवास, भोजन इत्यादी बाबींचा समावेश आहे) व (सन 2024-25 साठी प्रती विद्यार्थी कोचिंग, प्रती विद्यार्थी पुस्तके व स्टडी मटेरियल, निवास, भोजन) | 1) (SCP) अंतर्गत अनुसूचित जातीचे-15 विद्यार्थी X रू.1,65,000 = **24,75,000/-**<br>2) आदिवासी उपयोजना-TSP अनु.जमातीचे 40 विद्यार्थी X रुपये 1,65,000/- = **66,00,000/-**<br>3) इतर सामाजिक प्रवर्गातील 55 विद्यार्थी X रुपये 1,65,000/- = **90,75,000/-**<br>---<br>**एकुण रक्कम रुपये 1,81,50,000/- (अंक्षरी रुपये एक कोटी एक्याऐंशी लक्ष पन्नास हजार पाचशे रुपये मात्र).** | रू.15000/- (अक्षरी पंधरा हजार मात्र) | रु.544500/- (अक्षरी पाच लक्ष चौरेचाळीस हजार पाचशे मात्र) |

1. सदर ई-निविदा प्रक्रिया संपुर्णतः ऑनलाईन प्रक्रियेव्दारे राबविण्यांत येत आहे.
2. निविदेचे वेळापत्रक, तपशिल , साहित्यांचे वर्णन, धनाकर्ष, फी इत्यादी बाबी पाहण्यांसाठी कृपया www.mahatenders.gov.in या संकेतस्थळास भेट दयावी.
3. निविदा दिनांक १८ / ७ /२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजे पासून दिनांक ०२ / ०८ /२०२३ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यन्त www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन डाऊन लोड व सबमिशन करता येईल.
4. सदर ई-निविदेचा तांत्रिक लिफाफा दिनांक ०३ /०८/२०२३ रोजी सायंकाळी ५.०० वाजता निविदाधारकांच्या प्रतिनिधी सक्षम उघडण्यांत येईल. निविदा त्याच दिवशी उघडता न आल्यास इतर सोयीच्या दिवशी उघडण्यांतबाबत संबधीत निविदाधारकांना कळविण्यांत येईल.
5. निविदाधारकांना वरील तपशीलातील दर ऑनलाईन रित्या निविदेसोबत भरुन अपलोड करणे आवश्यक आहे.
6. ज्या निविदाधारकांनी निविदा स्विकृत होणार नाही, त्यांची बयाणा रक्कम तातडीने परत देण्यात येईल.

लेखाधिकारी
वित्त विभाग, जि.प.नाशिक

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, नाशिक

जिल्हा समाजकल्याण अधिकारी
जिल्हा परिषद, नाशिक

अति.मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, नाशिक

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, नाशिक

**अनुसूचित जाती/जमाती व इतर सामाजिंक प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरीता (मुले-मुलीकरिता) JEE+NEET या व्यावसायिक प्रवेश परिक्षांकरिता Super-50 या नाविण्यपूर्ण उपक्रमासाठी सन 2023-24 व 2024-2025 या दोन वर्षासाठी 110 विद्यार्थ्यांना निवास, भोजन व्यवस्थेसह प्रशिक्षण देणे बाबत.**

## जाहिर ई-निविदा (गुणांकन पध्दतीनुसार)

## अटी व शर्ती

1) ई-निविदा प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर राबविण्यांत येत आहे.

2) ई-निविदे संदर्भातील सुचना/शुध्दीपत्रके ई. ऑनलाईन पध्दतीने शासनाच्या वरील अधिकृत बेबसाईटवर राबविण्यांत येईल.

3) इच्छुक निविदाधारकांनी सदर ई-निविदेमध्ये सहभागी होण्यासाठी वरील वेबसाईटवर दिलेल्या सुचनांचे पालन करणे आवश्यक आहे.

4) सदर जाहिर ई-निविदा दिनांक १८ / ०८ /2023 रोजी वेळ सकाळी ११:00 वाजे पासून दिनांक ०२ /०८ /2023 रोजी सांयकाळी ४:00 वाजेपर्यन्त ऑनलाईन रित्या डाऊनलोड व सबमिशन करता येईल.

5) सदर निविदेमध्ये सहभागी होण्यासाठी इच्छुक निविदाधारकांना निविदा **फार्म फी रुपये** ९४000/- व 3% निविदा **बयाना रक्कम रुपये 5,44,500/- (अक्षरी रुपये पाच लक्ष चौरेचाळीस हजार पाचशे मात्र)** ई- टेंडरिंग पोर्टलव्दारे Online भरणा करणे आवश्यक आहे.

6) ज्या निविदाधारकांचे वर नमुद नमुना तांत्रिक तपासणीमध्ये पात्र असतील अशाच निविदाधारकांचे व्यापारी लिफाफे घडण्यांत येईल.

7) निविदाधारकांनी वरील प्रमाणे बाबी विहीत वेळेमध्ये सादर न केल्यास त्यांची निविदा अवैध ठरविण्यांत येईल.

8) निविदेचा तांत्रिक लिफाफा उघडण्याचा संभाव्य दिनांक ०३ / ०८ /2023 रोजी सायं. ४:00 वाजता उघडण्यांत येईल.

9) ज्या निविदाधारकाची निविदा मंजुर होईल अशा निविदाधारकास या कार्यालयाकडून कार्यारंभ आदेश देण्यांत येईल. कार्यारंभ आदेश घेतेवेळी निविदाधारकाने निविदेतील अटी व शर्ती मंजुर असलेबाबत नियमानुसार आवश्यक बॉडपेपरवर करारनामा करणे अनिवार्य राहील.

10) उपलब्ध तरतुदीचे अधिन राहूनच आदेश देण्यांत येतील. निविदा सुचनेतील नमुद परिमाण संख्येत वाढ/घट होण्यांची शक्यता आहे.

11) मुदतीत प्रशिक्षण पूर्ण न केल्यास विहीत नियमांनूसार प्रती आठवडा 0.5% प्रमाणे दंडाची रक्कम देयकातुन वसूल करण्यांत येईल.

12) राज्य शासन व केंद्र शासनाची किंवा जिल्हा परिषदेशी संबधीत असणाऱ्या व्यक्तीस निविदा भरता येणार नाही.

13) कोणतीही सशर्त निविदा स्विकारली जाणार नाही/ विचारात घेतली जाणार नाही.

14)निविदाधारकाच्या प्राधिकृत प्रतिनिधीने निविदेच्या सर्व कागदपत्रांवर स्वाक्षरी करुन सर्व कागदपत्रे स्वाक्षांकित करुन ऑनलाईन रित्या अपलोड करणे आवश्यक आहे.

15)निविदेतील मंजुर दर एक वर्षापर्यन्त ग्राह्य राहतील. त्यानुसार यापुढे उपलब्ध होणाऱ्या प्रशिक्षण आदेश देण्यांत येतील. त्या दराने प्रती विद्यार्थी प्रशिक्षण (कोचिंग), प्रती विद्यार्थी पुस्तके व स्टडी मटेरियल, शैक्षणिक सरावासाठी टॅब, निवास व्यवस्था व भोजन व्यवस्था करणे बंधनकारक असून मंजुर दरास कोणतीही भाववाढ देण्यांत येणार नाही.

16)निविदेबाबत कोणतीही शंका/ प्रश्न असल्यास निविदा भरण्यांच्या तारखेच्या किमान 3 दिवस आगोदर लेखी स्वरुपात विचारल्यास शंका निरसन करण्यांत येईल.

17)निविदाधारकांच्या / उत्पादकांच्या उत्पादन केंद्रांचे त्रयस्त यंत्रणे मार्फत आवश्यकता असल्यास भेट देऊन सदर साहित्य सुव्यवस्थित व सुस्थितीत असलेबाबतची पाहणी करण्यांत येईल. सदर पाहणीसाठी लागणारा खर्च निविदाधारकास करणे बंधनकारक राहील. त्याबाबत निविदाधारकास वेगळ्याने कळविण्यांत येईल.

18)इच्छुक निविदाधारकांनी खालील प्रमाणे कागदपत्रे/ बाबींची पुर्तता करणे आवश्यक आहे. सदर कागदपत्रक पी.डी.एफ. फॉरमॅटमध्ये स्कॅन करुन वेबसाईटवर ऑनलाईनरित्या जिल्हा परिषदेस सादर करणे बंधनकारक आहे. सदर तांत्रिक लिफाफ्यात कागदपत्रांची अर्हता पूर्ण करीत असलेले पात्र असणाऱ्या निविदाधारकांचे वित्तीय लिफाफे उघडण्यांत येतील.

19)निविदा कोणतीही पुर्व सुचना न देता रद्द करण्यांचे अथवा अटी शिथिल करण्यांचे अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी राखून ठेवलेले आहेत.

| | | |
|---|---|---|
| लेखाधिकारी<br>वित्त विभाग, जि.प.नाशिक | 18/9/23<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक)<br>जिल्हा परिषद, नाशिक | जिल्हा समाजकल्याण अधिकारी<br>जिल्हा परिषद, नाशिक |

| | |
|---|---|
| अति.मुख्य कार्यकारी अधिकारी<br>जिल्हा परिषद, नाशिक | मुख्य कार्यकारी अधिकारी<br>जिल्हा परिषद, नाशिक |

## तांत्रिक लिफाफा (Technical Envelope)

| अ.क्र. | प्रशासकीय बाबी | गुण |
|---|---|---|
| १ | १) निविदेतील अटी व शर्ती मान्यतेबाबतचे हमीपत्र.<br>२) शैक्षणिक संस्था नाशिक जिल्हा परिषदेपासुन अंदाजे ३५ किलोमीटर परिक्षेत्रात असणे आवश्यक राहील.<br>३) अधिनियम, १८६० नुसार संस्था नोंदणीकृत असलेबाबतचे प्रमाणपत्र.<br>४) अधिनियम, १९५० नुसार संस्था नोंदणीकृत असलेबाबतचे परवानगीपत्र .<br>५) मा.सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांचेकडील शेडयुल-१ ची प्रत.<br>६) संस्था व शाळेच्या संबंधात कोणतेही वाद तसेच न्यायालयीन प्रकरण न्यायप्रविष्ट नसलेबाबतचे संस्थेचे हमीपत्र.<br>७) संबंधित संस्थेतील कार्यकारी संचालक मंडळाचा सभेतील सदर सुपर-५० या नाविण्यपूर्ण उपक्रमास मान्यता असलेबाबतच्या ठरावाची प्रत.<br>८) संस्था मान्यतेचा शासन आदेश.<br>९) विज्ञान शाखा व तुकडी मान्यतेचा शासन मान्यता आदेश.<br>१०) अध्यापनामध्ये संगणके, ओव्हरहेड प्रोजेक्टर, एल.सी.डी.आदी तांत्रिक बाबी उपलब्धते बाबतची संख्या व फोटो तसेच क्रिएटीव्ह लर्निंग साहित्य उपलब्धेबाबतचे फोटो.<br>११) इयत्ता ११ वी विज्ञान शाखेत सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षामध्ये ११० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याची क्षमता असणे आवश्यक आहे.<br>१२) सन २०२१-२२ व सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात सनदी लेखापाल यांनी प्रमाणित केलेले लेखापरीक्षण अहवाल व अपवादात्मक स्थितीत विभागामार्फत निधी प्राप्त होईपर्यंत संस्था सदर योजना राबविण्यास आर्थिक दृष्टया सक्षम असल्याचे प्रमाणपत्र.<br>१३) संस्था परिसरात मुला-मुलींसाठीचे स्वतंत्र वसतीगृह असणे आवश्यक असून, सदरचे वसतीगृह विद्यार्थ्यांच्या राहणेसाठी सुरक्षित असल्याबाबत जिल्हयातील ग्रामीण क्षेत्रातील शैक्षणिक संस्थेसाठी कार्यकारी अभियंता (इवद), जिल्हा परिषद, नाशिक व शहरी क्षेत्रातील शैक्षणिक संस्थेसाठी कार्यकारी अभियंता (सा.बां.) , नाशिक यांचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे तसेच भोजन गुणवत्ता दर्जेदार असलेबाबत सहाय्यक आयुक्त (अन्न व औषधे) विभाग, नाशिक यांचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.<br>१४) कार्यरत असलेला पुरेसा शिक्षक (अध्यापक वर्ग), शिक्षकेतर कर्मचारी वर्ग यादी.<br>१५) संस्थेला कंपाऊंड, दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी रॅम्प असलेबाबतचे फोटो.<br>१६) मुलांच्या सुरक्षेसाठी योग्य ती व्यवस्था (सुरक्षारक्षक, अग्निशमन, आरोग्य इ.) (सुरक्षारक्षकांची नावाची यादी, मोबाईल क्रमांकासह, अग्निशमन सुविधेचे फोटो)<br>१७) मुलांच्या आरोग्याचे दृष्टीने प्रथोपचार साहित्य आवश्यक असून, शाळेच्या दर्शनीय भागात डॉक्टर्स यांचे मोबाईल क्रमांक असणे आवश्यक आहे.<br>१८) संस्थेकडे GST Registration प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील, मागील तीन वर्षे (सन २०२०-२१, सन २०२१-२२, सन २०२२-२३) आयकर रिटर्न भरणा केलेले दस्तऐवज/ कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहील.<br>१९) सोबत दिलेल्या करारानाम्यावर स्वाक्षरी करणे बंधनकारक राहील.<br>वरील बाबींचे पुरावे जोडणे बंधनकारक व आवश्यक आहेत. | ५ |
| २ | विज्ञान प्रयोगशाळेसाठी खालील बाबी आवश्यक असून, पुरावा जोडावा.<br>अ) प्रयोग शाळेकरीता १८ X २२ चे स्वतंत्र दालन असणे आवश्यक. (त्याबाबतचा पुरावा जोडावा)<br>ब) भौतिक शास्त्रासाठी आवश्यक ते साधन सामुग्री असणे आवश्यक. (त्याबाबतचा पुरावा जोडावा)<br>क) जीवशास्त्रासाठी आवश्यक ते साधन सामुग्री असणे आवश्यक. (त्याबाबतचा पुरावा जोडावा)<br>ड) रसायनशास्त्रासाठी आवश्यक ते साधन सामुग्री असणे आवश्यक. (त्याबाबतचा पुरावा जोडावा) | ५ |
| ३ | ग्रंथालय खालील बाबी आवश्यक असून, पुरावा जोडावा.<br>अ) ग्रंथालयामध्ये प्रत्येक विषयाची पुस्तके/संदर्भ ग्रंथ मराठी विश्वकोष, वृत्तपत्रे, मासिक, नियतकालिके असणे आवश्यक. | ५ |

| | | |
|---|---|---|
| | ब) पुस्तकांकरिता कपाटे/वाचकांकरिता बसण्याची व्यवस्था असंणे आवश्यक.<br>क) ग्रंथालय सुविधेचा सर्व विद्यार्थी/शिक्षकांसाठी शाळेच्या वेळेत व नंतरही अधिकाधिक वापर. | |
| ४ | संस्थेमध्ये आवश्यक विद्युत रोषणाई (आवश्यक लाईटस्) तसेच विद्युत प्रवाह खंडीत झाल्यास जनरेटर असणे आवश्यक आहे (पुरावा जोडावा) | ५ |
| ५ | <u>वंसतीगृह/प्रसाधनगृहे खालील बाबी आवश्यक असून, पुरावा जोडावा.</u><br>अ) महाविद्यालय व वसतीगृह एकाच आवारात असणे आवश्यक आहे.<br>ब) मुलांसाठी स्वतंत्र वसतीगृह/प्रसाधन गृह (विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात असावी)<br>क) मुलींसाठी स्वतंत्र वसतीगृह /प्रसाधनगृहे (विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात असावीत)<br>ड) प्रसाधनगृहासाठी मुबलक पाणी उपलब्धता.<br>इ) प्रसाधनगृहाची साफसफाई/स्वच्छता. | ५ |
| ६ | <u>पिण्याच्या पाण्याची सुविधा खालील बाबी आवश्यक असून, पुरावा जोडावा.</u><br>अ) संस्थेत स्वच्छ व सुरक्षित पिण्याच्या पाण्याची पुरेशी व्यवस्था (पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, उपलब्ध सुविधा नळ, पाईप, बोअरवेल इ.) असणे आवश्यक (पुरावा जोडावा)<br>ब) पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता. | ५ |
| ७ | <u>संगणक प्रयोगशाळा/संगणक कक्ष खालील बाबी आवश्यक असून, पुरावा जोडावा.</u><br>अ) संस्थेमध्ये पुरेशा प्रमाणात संगणक असणे आवश्यक आहे. (पुरावा जोडावा)<br>ब) संगणक प्रयोगशाळेत बसण्याची व्यवस्था असणे आवश्यक आहे. (पुरावा जोडावा)<br>क) संगणक प्रयोगशाळेत इंटरनेट व्यवस्था असणे आवश्यक आहे. (पुरावा जोडावा) | ५ |
| ८. | अ) जे.ई.ई./एन.ई.ई.टी. (NEET) साठी प्रशिक्षित व अनुभवी अध्यापक वर्ग असणे आवश्यक.<br>ब ) **सन २०२०-२१, सन २०२१-२२ व २०२२-२३ या तीन शैक्षणिक वर्षात सदर संस्थेचे JEE/NEET या परिक्षांमध्ये उत्तीर्ण होऊन IIT/ NEET/AIMS यासारख्या वैद्यकीय व अभियांत्रिकी शाखेत प्रवेशीत झालेल्या विद्यार्थ्यांची वर्षनिहाय संख्या व यादी.** | १५ |
| ९ | **संस्थेतील भौतिक, शैक्षणिक व इतर बाबींचे सोई-सुविधांबाबत P.P.T.** | १५ |
| १० | **प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येइतके प्रती विद्यार्थी शैक्षणिक सरावासाठी टॅब/लॅपटॉप/संगणकांची सुविधा उपलब्ध असलेबाबतची यादी (Inventory) सादर करणे.** | ५ |

## <u>व्यापारी (वितीय) लिफाफा</u> (Financial Envelope)

| अ.क्र. | वित्तीय बाबी | गुण |
|---|---|---|
| १ | १. निविदेसोबत दिलेल्या BOQ File मध्ये दर भरणे निविदाधारकांना अनिवार्य आहे.<br>२. सदर BOQ File मध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करु नये. निविदाधारकाने दर भरत असतांना दरामध्ये सर्व करांचा (विक्रीकर, केंद्रीय उत्पादन शुल्क, आयकर, जी.एस.टी. इत्यादी सर्व शासकीय कर) आणि वाहतुक खर्चासह समावेश करुन दर भरणे आवश्यक आहे.<br>३. सदर दर BOQ File मध्ये भरुन ऑनलाईनरित्या अपलोड करणे निविदाधारकांना बंधनकारक आहे.<br>४. सादर करण्यात येणारा दर प्रती विद्यार्थी या दराने संभाव्य ११० विद्यार्थ्यांकरिता सादर करण्यात यावा.(निविदा अटी व शर्ती प्रमाणित केलेप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२३-२४ आधारभूत मानुन दर सादर करावा.) | ३० |

लेखाधिकारी
वित्त विभाग, जि.प.नाशिक

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, नाशिक

जिल्हा समाजकल्याण अधिकारी
जिल्हा परिषद, नाशिक

अति.मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, नाशिक

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, नाशिक